# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
## ग्राहक तक्रार निवारण मंच
## कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर यांचे समोर

ग्राहक तक्रार क्र. २७२–२०१०/ दिनांक :

**केस क्र. २७२/२०१०**

श्री. संभाजी कल्लाप्पा नाईक,,
रा. कोकळे, ता. कवठे महांकाळ, जि. सांगली — अर्जदार

**विरूध्द**

१) कार्यकारी अभियंता (का.) तथा नोडल ऑफीसर,
म.रा.वि.वितरण कं.लि.,संवसु मंडळ कार्यालय,
मंडल कार्यालय, विश्रामबाग, सांगली

२) कार्यकारी अभियंता
म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,
विभागीय कार्यालय, कवठे महांकाळ, जि. सांगली

३) सहाय्यक अभियंता,
म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,
उप विभागीय कार्यालय, कवठे महांकाळ, जि. सांगली — विरूध्द पक्षकार

**कोरम** :– १) श्री. बी.जी. पवार, अध्यक्ष,
२) श्री. जी.बी. पानकर, सदस्य–सचिव
३) श्री. जी.सी. लेले, सदस्य

महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग
( ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल )
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

**न्याय निर्णय**

श्री. जी. बी. पानकर, सदस्य सचिव, ग्रा.त.नि.मंच, कोल्हापूर खालील प्रमाणे न्याय निर्णय देत आहेत.

श्री. संभाजी कल्लाप्पा नाईक, रा. कोकळे, ता. कवठे महांकाळ, जि. सांगली यांनी आपले प्रतिनिधी श्री.खापरे यांच्यामार्फत मंचाकडे अनुसूची अ मध्ये महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ चे कलम ६.१० च्या तरतुदीनुसार दि. २०.१०.२०१० ला तक्रार दाखल केली. त्याचा तपशील खालील प्रमाणे –

ग्राहकाने आपल्या कोकळे येथील शेतीपंपासाठी नवीन वीज पुरवठा मिळावा यासाठी रितसर अर्ज दिला असून चलन रु. ४,०००/– पावती क्र. ५३२५४५३ दि. २७.१.२०१० रोजी भरलेले आहे व त्याचा संच मांडणीचा टेस्ट रिपोर्ट दि. ८.६.२०१० रोजी उप विभागीय कार्यालयास दिलेला आहे. वितरण कंपनीने कृती मानके विनियमानुसार त्यांना दि. ७.७.२०१० पर्यंत विद्युत पुरवठा करणे आवश्यक होते. ग्राहकाने अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, सांगली यांचेकडे तक्रार क्र. ८२० दि. १६.२.२०१० नुसार रितसर तक्रार दाखल केली. कक्षाने दि. २९.३.२०१० रोजी आदेश पारीत केला. मंचाकडून अपेक्षित मदत – कृती मानके विनियमानुसार वीज जोडणी देण्यास झालेल्या विलंबाबाबत भरपाई मिळावी.

अंतर्गत तक्रार निवारण कक्षाने दि. २९.३.२०१० रोजी आदेश दिला असतांना मंचाकडे अपील दि. ३०.८.२०१० रोजी दाखल केले गेले. परंतु सदरहू अपील हे कक्षाच्या निकालाच्या ६० दिवसानंतर केल्याने मंचाने सदर अपील मान्य केले नाही. तथापि दि. १८.९.२०१० रोजी सांगली येथील सुनावणीच्यावेळेस ग्राहक प्रतिनिधी श्री. खापरे यांच्या विनंतीवरुन सदर तक्रार दि. २०.१०.२०१० रोजी केस क्र. २७२/२०१० ने दाखल करुन सुनावणीसाठी दि. १०.११.२०१० रोजी ठेवण्यात आली.

प्रस्तुतची तक्रार मंचासमोर दि. १०.११.२०१० रोजी सुनावणीस घेतली असतां, तक्रारदार प्रतिनिधी हजर. वितरण कंपनीतर्फे श्री.क्षीरसागर, नोडल ऑफीसर, सांगली, श्री. कुलकर्णी, कनिष्ठ अभियंता कवठे महांकाळ विभाग हे हजर होते.

ग्राहकाने दि. २७.१.२०१० रोजी चलन भरल्याचे मान्य केले व दि. ८.६.२०१० रोजी ३ एच.पी. पंपासाठी टेस्ट रिपोर्ट दिल्याचे वि.प.ने मान्य केले. सदर ग्राहकास सर्व्हीस कनेक्शन म्हणून मंजुरी देण्यात आली असून टेस्ट रिपोर्टप्रमाणे मीटर जोडणी करण्यासाठी लाईन स्टाफ गेले असतां, ग्राहकाने त्यासाठी संमत्ती दर्शविली नाही. त्यामुळे सदर कनेक्शन वि.प.स देता आले नाही. नंतर फेर सर्व्हेक्शन करुन ग्राहकाच्या मागणीनुसार १ पोल उभारुन कनेक्शन देण्यात आले.

सुनावणीच्यावेळेस ग्राहक प्रतिनिधी श्री. खापरे यांनी वि.प.ने केलेल्या कार्यवाहीवर समाधान झाल्यामुळे तक्रार मागे घेत असल्याचे सांगितले व त्याप्रमाणे लेखी पत्र दि. १६.११.२०१० पर्यंत मंचाकडे सादर करण्याचे मान्य केले. त्या प्रमाणे ग्राहक प्रतिनिधी यांचे पत्र दि. २५.११.२०१० रोजी प्राप्त झाले. त्यामुळे वि.प.स विद्युत पुरवठा करण्यास विलंब झाल्याबाबत भरपाई देणे संयुक्तिक वाटत नाही.

## आदेश

१) तक्रार मागे घेतल्यामुळे निकाली काढण्यात येत आहे.

२) खर्चाबाबत आदेश नाही

दिनांक :

( जी. बी. पानकर )
सदस्य सचिव

श्री. बी. जी. पवार, अध्यक्ष :

श्री. जी. सी. लेले, ग्राहक सदस्य :

एकमताच्या / बहुमताच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी.